# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/ 906

दिनांक :- 22 MAR 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित

पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत...**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१७/६१ दिनांक ०८/०३/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.मंत्री महसूल व वन विभाग यांचे सचिव (वने) यांचे अर्ध शासकीय पत्र तसेच मा.मंत्री वित्त आणि नियोजन, वने यांचे पत्र या सोबत जोडण्यात येत असून सदरील पत्रात नमुद केल्या प्रमाणे वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदरस्य नोंदणी करण्यात यावी. त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

सोबत :- वरील प्रमाणे .

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

महाराष्ट्र शासन

अ.शा. पत्र क्र. : साववि-२०१६/प्र.क्र.१३३/फ-११
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २०१७

शासन

१) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
६) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका (गट-अ)
७) सर्व विभाग प्रमुख

विषय :- <u>वन विभागाच्या "महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या" संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत</u>

महोदय/महोदया,

राज्यामध्ये १ जुलै, २०१६ रोजी जनतेच्या सहभागाने एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवण्याचे उद्दिष्ट सह ओलांडले गेले. प्रत्यक्षात एकाच दिवशी २.८३ कोटी वृक्ष लागवड झाली. "लिमका बुक ऑफ रेकॉर्ड" या संस्थेने आगळया वेगळया आणि नाविन्य कार्यक्रमाची दखल घेतली आहे. आपल्या सर्वांच्या प्रामाणिक, आणि स्वंयस्फुतीने केलेल् कामामुळे हे यश संपादन करता आले. त्याबद्दल मी आपले मन:पुर्वक आभार मानतो व अभिनंदन करतो.

२. जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतु बदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्य नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसा पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमां : साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शासनाच्या सर्व विभागांचा समावेश आहे.

३. नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करु यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी **"महाराष्ट्र हरित सेना"** स्थापि करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य नोंदणी करण्यासा greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनां ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी स्वयंस्फुतीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावं असे अपेक्षित आहे.

४. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधि क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षिस योजना व इत सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळाव आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी प्रमाणपत्र यंत्रणेत तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर पाठविले जाते.

५. तेरी, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व कर्मचारी, अधिकारी, त्यांचे कुटूंबिय, आप्तेष्ठ, मित्र परिवार, सामाजिक शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय आणि खाजगी संस्था यांना महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंद करण्याबाबत कृपया आवाहन करावे. या लोकोपयोगी आणि सध्याच्या व भविष्यातील पिढीला उत्तम व सुरक्षित पर्यावर देण्याच्या उपक्रमात सक्रीय सहभाग घेण्याबाबत आपणा आणि इतर! सर्वांनी या उपक्रमात सदस्य नोंदणी केल्यास म आपला अत्यंत आभारी राहीन.

सस्नेह !

संवशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यासन क्र.

आपला

(विकास खारगे)
सचिव (वने)

जा.क्र./मंत्री/वि.नि. व वने/नोट/ ९३९ /दिनांक ३१/०१/२०१७

महाराष्ट्र राज्य

मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ३१/१२/२०१७

विषय :- <u>वन विभागाच्या "महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या" संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत.</u>

राज्यामध्ये १ जुलै, २०१६ रोजी जनतेच्या सहभागाने एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लावण्याचे उद्दिष्ट सहज ओलांडले गेले हे आपणांस कळविण्यास आनंद वाटतो. प्रत्यक्षात एकाच दिवशी २.८३ कोटी वृक्ष लागवड झाली. "लिमका बुक ऑफ रेकॉर्ड" या संस्थेने या आगळया वेगळया आणि नाविन्य कार्यक्रमाची दखल घेतली आहे. आपल्या सर्वांच्या प्रामाणिक आणि स्वंयस्फुर्तीने केलेल्या कामामुळे हे यश संपादन करता आले. त्याबद्दल मी आपले मन:पुर्वक आभार मानतो व अभिनंदन करतो.

२. जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतु बदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरुन ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून, वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार पुढील ३ वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : सावनि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दिनांक १०.१०.२०१६ अन्वये कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शासनाच्या सर्व विभागांचा समावेश आहे.

३. नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करुन यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी “महाराष्ट्र हरित सेना” स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी, स्वयंस्फुतीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी, असे अपेक्षित आहे.

४. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रामध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षिस योजना व इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे. नोंदणीची पध्दत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेत स्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे आणि त्यानुसार प्रमाणपत्र सिस्टिमध्ये तयार होवून सदस्याच्या मेल आयडीवर आणि एसएमएस वर पाठविले जाईल.

५. आपल्या विभागातील सर्व कर्मचारी, अधिकारी, त्यांचे कुटूंबिय, आप्तेष्ठ, मित्र परिवार, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय आणि खाजगी संस्था यांनी महाराष्ट्र हरित सेनेमध्ये सदस्य नोंदणी केल्यास त्यांना अशा उपक्रमात काम करण्याची संधी मिळेल.

६. तरी, या लोकोपयोगी आणि सध्याच्या व भविष्यातील पिढीला उत्तम व सुरक्षित पर्यावरण देण्याच्या दृष्टीने वर नमूद सर्वजणांनी "महाराष्ट्र हरित सेनेचे" सदस्य म्हणून नोंदणी करण्याबाबत आपण सर्वांना आवाहन करावे अशी विनंती आहे. तसेच, हयाबाबत संनियंत्रण व समन्वय करुन जास्तीत जास्त सदस्य नोंदणी होण्यासाठी पुढाकार घ्यावा अशीही विनंती आहे.

सस्नेह !

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. ...
दिनांक ...
कार्यासन क्र. ...

D-4A (39)

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रति,
सर्व विभाग प्रमुख

डॉ. सुभाष महाजन, संचालक, तंत्र शिक्षण, ३, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१